म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. २३५१

# विफल शिखा

कृ. श्री. पेडणेकर



विफलशिखा

२२३५८
१५।१०।७८
काव्य संदर्भ
२३५९

# विफलाशिखा

कृ. श्री. पेडणेकर

ज्ञानविज्ञान प्रकाशन

पहिली आवृत्ती :
२० ऑगस्ट १९७८

मूल्य ६ रुपये

© १९७८, कृ. श्री. पेडणेकर

मुखपृष्ठ :
अरुण काळे

मांडणी :
अरुण घाटे

मुद्रक :
प्र. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४००००४

प्रकाशक :
सुशीला पानसे
ज्ञानविज्ञान प्रकाशन
सोनोरी, ३६ चरई
ठाणे ४०० ६०१

♠

या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी
ठाण्याचे डॉ. म. ग. हजिरनीस
यांचे आर्थिक साहाय्य लाभले आहे.

वितरक :
श्री बुक डेपो
शिवसमर्थ विद्यालय
राममारुती रोड
ठाणे ४०० ६०१

अनुक्रम

बंगला काचांचा ९
प्रीतीचीं गांवें १०
फक्त सदेह मिळालों ११
दुष्ट ओठांतील वेणू १२
लतिकेवरती गीत १३
वनवासाने १४
नवखिच आलिस १५
प्रीत तुझी १६
तुझ्या ओठा-डोळ्याविण १७
फिरकी १८
पूर्ण चंद्र तुझा दिवा १९
एकएकट्याची प्रीती २०
स्पर्श अग्निजन्य २१
नको वारंवार फिरूं २२
मात्र तिच्या मनामध्ये २३
मिठीविना २४
बघ जग निळेंकाळें २५
गुपितहि माझें २६
तिच्याच गात्रीं २७

म. रा. ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. २२३५८
काव्य
२३५९
शाखा (स्थळ प्रत)

अनुक्रम

माझी बायको २८
गूढमूढ जरि २९
माझ्या मनांतील काळें ३०
ठकीचसाठी ३१
तुझ्याच मागे ३२
अवशेष ३३
गीत वेगळें ३४
तीं दोघें ३५
पाकळ्या आणि साखळी ३६
चावट तें तें ३७
रातकिडा ३८
युगंधराचा संहार हवा ! ३९
लिंबाखालीं ४०
मेघच व्हावें आकाशाने ४१
मोजावीं पाउलें ४२
पावसास गंध नवा ४३
मध्यान्ह झपाटित आली ४४
आपुला हा थोर देश ४५
उजाड देशीं ४६
संध्याकालीन पावसांत ४७

♠

कवनांस लाविली आग, धगीने जाळियलें घरदार
तरीही सुटलों : स्फूर्तिदेवता जळून झाली ठार....
निस्संगाने बेशक केल्या कविता वारंवार,
स्फूर्तीनेही मनांत केलें घरकुल डेरेदार !

♠

बंगला काचांचा

तसें तिचें माझें
नाही कांही नातें
फक्त गीत येतें

आहे तिचा माझा
(जरा लेचापेचा)
बंगला काचांचा

तिच्यामध्ये आहे
(जरा जीवघेणी)
हृद्य हिरकणी

लावण्याला तिच्या
(जरा कलंदर)
येतात लंगर

लावण्यभाराने
वाकतां ती खालीं
होती उलाढाली

*प्रीतीचीं गांव*

यावें तूं अन् आपण जावें
शोधाया प्रीतीचीं गांवें

यावें तूं, आणावें रस्त्याचें गाणें
स्वस्त असें गावयास
मस्त असें धुंदीविण प्यावयास आणावें;
ताणावे तंबू तूं, मी बांबू आणावे.

एक गांव यावें : एक नांव घ्यावें
रात्रीच्या शांतीचे पळ जरा पहावे
उजाडण्यापूर्वी पण निघूनिया जावें.

एक गांव यावें दिवसां
संभ्रमांत न्हावें तूं-मी....
दैन्य किती, संपन्नही.
वन्य पशू यावे; आपणही गावें.

गेले किती दिस-रात्री,
किती गांव आले;
आपणांस वेदनांत
हर्ष हर्ष झाले....

♠

फक्त सदेह
मिळालों

तुला वाटलें कांही
शाईहून प्रवाही मंगल
निरंलकृत मन तुझेंच बसलें
कसलें गाणें गात
मीही टेकले हात
न दिसले विझले प्राणही आत.

उंबरठ्यावर तुझी प्रतिष्ठा
उंबरठ्यावर माझी निष्ठा
अंतर्बाह्य मनावर ताजी
वासनातली ही वनराई
कितीक केले यत्न आणखी कधीं मोकळे झालों
असें वाटलें तोंच अचानक संसारांत जळालों
फक्त सदेह मिळालों.

♠

दुष्ट ओठांतील वेणू

प्राणवेणू जाणुनी तूं जाणुनी तूं फुंकिला
प्राण माझा जिंकिला
जागलों मी मध्यरात्रीं मंदिरीं दारीं उगी
चारुगात्री, तूं उभी
जिद्द नेत्रांतून, थोडे हात माझे वाढले
तूंहि मजला ओढिलें
केशपाशांतील तूं-मी वेष सगळा सांडला
डाव कसला मांडला
चंद्र तू वातायनी त्या, सूर ते गेले कुठे
ऊर गे सारें उठे
दुष्ट ओठांतील वेणू कां जिव्हारीं फिरविला
प्राण माझा हरविला

♠

*लतिकेवरती गीत*

सुंदरशी फुलवेल
अंगणीं सुंदरशी फुलवेल
तिच्या मनाचा मेळ
सुवासिक तिच्या मनाचा मेळ
तिचे नेत्र मधुपंख
सुलक्षण तिचे नेत्र मधुपंख
नित फुलवी आनंद
सुकेशी नित फुलवी आनंद
लतिकेवरती गीत
रचविते लतिकेवरती गीत
परमेशाची रीत
स्मरते परमेशाची रीत

♠

वनवासाने

तू गिरिबाला सोनसळा
कड्याकड्यांचा तुला लळा
तुझ्या नि माझ्या आयुष्याचा
मलाथोरला दग्ध मळा

तुला लागते तहान, मूढें
वाळवंट नेत्रांत दिसे;
बघ रक्ताचें करून पाणी
घाट बांधिले कसेबसे

वनवासाने गात्रीं अपुल्या
तरारून आलीं पातीं
उधळून गेल्या आयुष्याची
सुपीक होऊं दे माती

♠

*नवखिच आलिस*

नवखिच आलिस
घेउनि नयनीं
खुल्या दिलाची विलास-नगरी
    अवचित गेलिस
    जपलीं मन्मनीं
    घेउनि स्वप्नें मंथर बुजरीं
देणें-घेणें
तुलाच सुचतें
जलदामधल्या मुक्त सरीपरि
    तव ऋण सरणें
    मला न रुचतें
    शरदामधल्या कृपण घनापरि

♠

*प्रीत तुझी*

प्रीत तुझी धरणीवर
कधिं बसते कधिं उठते
धरतीला उठबस ही
नच म्हटलें तरि पटते

प्रीत तुझी आभाळीं
कधिं चढते कधिं पडते
गगनाला पडझड ही
नच म्हटलें तरि रुचते

मात्र कधीं प्रीत तुझी
वाऱ्यावर जंव उडते
याच क्षणीं मन माझें
थाऱ्यावर मुळि नसतें !

♠

*तुझ्या ओठा-डोळ्याविण*

तुझ्या ओठा-डोळ्याविण तुझ्यापाशी काय बरें ?
शोधशोधून हरलों, सांग पाहूं खरें खरें

डोळ्यांतली जादूगिरी मला आकळते थोडी,
ओठांतील कवितेची पण नाही मुळी गोडी

मी हा तत्त्वाचा शोधक, आणि रसज्ञ मनाचा
तुझा होकार-नकार आहे मला नवलाचा

शब्दांतून तुझ्या एका धुंडाळीन अंतराळें,
त्यांत ओतीन शैलीने कैक अर्थाचीं आभाळें

*फिरकी*

भोवळ आली घोर, अचानक
घेतलीस तूं जेव्हां गिरकी
तेव्हांपासून सूतसरळशा
मनास माझ्या जडली फिरकी

तेव्हांपासुन मंथन आहे
मनांत; आलीं रत्नें चंचल
फक्त हवें मज—नीलकंठ मी—
निळें हलाहल, निळें हलाहल !

भिजलेल्या डोळ्यासम
चंद्र हवा सुरकुतला
वाऱ्याचा झोत हवा
मेघांतुनि गुरफटला

क्षितिजकडा शून्य हवी
भकासल्या आडासम
तारकाहि सुन्न हव्या
मातींतिल दगडासम

तमभरल्या रात्रीसम
मन गिळील रुद्ध जिवा
त्याच क्षणीं हवा हवा
पूर्ण चंद्र तुझा दिवा

♠

*एकएकट्याची प्रीती*

तुझी आणि माझी
एकएकट्याची प्रीती
बाकी सारें जग
आम्हां नुसतीच भीती

चंद्र तुझी वेल
त्याला चांदणीचें पान
बाकी सभोवतीं
माझें आभाळाचें रान

समुद्राचा खण
मध्ये भोवऱ्याचा स्तन
बाकी सारें पाणी
भटकतें वणवण

♠

## स्पर्श अग्निजन्य

विझलेला दीप दीप अंधारी रात
दर्वळती श्वास नवे नवखणी घरांत
वीज फटींतून कधीं सांडते समोर
ओलावित काया तव पिवळी हिमगौर

ओघळती केशांच्या रेषांचे धाक :
कोळसे जळून अतां उरलेली राख
तुटते संघर्षरात्र, फिटतें जग शून्य
खांद्याशी फक्त तुझे स्पर्श अग्निजन्य....

नको वारंवार फिरूं

दिशादिशांत उरली, कोठे उफाळली आभा ?
कोण्या नभाची बिजली ? कोण्या मुलुखाची शोभा ?

तीर्थ असें पालवीत तुझें कधीमधी येत
थोडें मातींत आमुच्या कुठें खिळुनीच जातें

तेजाळत मुरलीच्या सुरांपरी तुवां यावें
रान घनघोर थोडेंतरी वृंदावन व्हावें

परी तोडून प्रकाश आम्ही धुंडाळतों दीप !
शंकायाचा माथ्यावरी आम्हां विचित्र हा शाप

अजाण गा असे आम्ही ! नको वारंवार फिरूं
वारंवार नको दीन नको धारेवर धरूं

♠

*मात्र तिच्या मनामध्ये*

तिच्या नावामध्ये काय?
संथ वाजतात पाय.
शुद्ध हातामध्ये हेतू
मला घे तू-मला दे तू
तिच्या वाणीमध्ये गाणी
लौकिकाचीं सनातनी

माझ्या आवेगांत वक्र
आक्रंदतें माझें चक्र.
अलौकिक ओघवती
रीत : उन्मनीत धुंदी ठसे,
शरीरात उठे-बसे....

माझ्या अंगप्रत्यंगांत
मीही कांही तीही कांही
मात्र तिच्या मनामध्ये
मीही नाही तीही नाही

♠

*मिठीविना*

तळहातांशी रीतच नव्हती प्रीत सविस्तर आकळण्याची
म्हणून झाली अर्धीमुर्धी प्रीति; अर्धीमुर्धी नीति.
काळोखाच्या आधी होते आगाउपणे फुटले डोळे
ऐन भराला मनांत आले उलट्या भावांचे हिंदोळे.
आणि हटकलें मग दुनियेने अधिकच थोडें न प्राक्तनाला,
नासविलेल्या क्षणाक्षणांना, शिवशिवणाऱ्या रिक्तपणाला.
अशी आणली नागरनीति सन्मुख असुनी अगम्य केलों;
प्राण राखुनी अंकुरतांना तीर्थावांचून क्षेत्रें झालों.
बघतां बघतां असा खुटेना पण शरिराचा देठ अमोलिक
मिठीविना दृष्टीच मिटेना, नजर स्थिरेना : समय अनामिक.

♠

बघ जग
निळेंकाळें

कुणीतरी कुठेंतरी तुझे लाड केले
लाडांनी त्या आतां असें तुला द्वाड केलें

बघत्यांनी तुझ्यामागे वेडेपीर व्हावें
अशी ओठींदिठीं तुझ्या खळखळ आहे

उतरतां नको वाकूं, फार नको ओतूं
मनांतल्या सोनसळी; अंगीं कलाबतू

पखरण सुगंधाची फार झाली, जाई,
तुझ्या कांठावरी जीव खालीवर होई

झुलतांना नको ठेंच लागूं देऊं : दुखे !
लावण्याच्या छंदांनाही कमी नाही धोके

कंठीं दडे सूर, नको रोखठोक बोलूं
शुभ्र दंतीं नको खडीसाखरेला फोडूं

बघ जग निळेंकाळें ! धीराने घे जरा;
सुदैवाचा कांचपेला भरूं दे ना पुरा !

मात्र सोड द्वाडपण, ठेवूं नको बाकी
बेरजेंत आहे वाढ : हवी वजाबाकी



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
22356
दा. क्र. 0104
2352
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

♠

गुपिताहि माझें

गुपितहि माझें जगास कळतें
तुला न कळतें मला न कळतें

फुलाफुलांचा वर्ख काढुनी
तुला दिला मीं अवघड शेला
त्या शेल्यांतिल अर्थ बापुडा
तळहातांना चाटुन मेला

आल्याघरची तऱ्हा म्हणावी
तरी गुप्त ही जरा अंगना....

*तिच्याच गात्रीं*

स्तन देऊन धन नेते
दळते होऊन जातें
नातें माझें थकून जातें
खातांना मग म्हणते
पिठाहुनी या वीट मऊ रे

सलते होऊन पातें
काळजांत चंद्राचें
चंद्र मी म्हणे सूर्यही मीच
मीच नक्षत्रें

मण मण वजनाखालीं
आल्यावर दडपुन जातें
ऋषितुल्य बळ माझें
तरी झेलतों ओझें

का ?—'क'ला कान
एवढेंच उत्तर सुचतें
उत्तररात्रीं तिच्याच गात्रीं
पवित्र होतां

स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यम्
देवो न जानाति कुतो मनुष्य ?

♠

*माझी बायको*

माझी बायको
चित्रें बघते
मासिकांतलीं माझ्या
अक्षरशत्रू
अडाणी न ही
सुशिक्षितासम गिरिजा

वाजविते ती
मस्त तुणतुणें
फुगवुन छाती बाजा
मटण पाहतां
ओठ मुरडते
खाते तृण-फळभाज्या

त्रैलोक्याची ही अधिराणी
मजला म्हणते राजा

♠

गूढमूढ जरि

मज मुलगी म्हणूं नको
मी नाही बाईही
मज नांवच नको नको
मी नाही कांहीहि

मी शाई कवितांची
पण नाही मी काळी
मी आई ललनांची
जरि मिळती मज गाळी

पण पुरुषांसम समर्थ
विश्वाचें संकीर्तन :
गूढमूढ जरि माझें
अंधारांतिल वर्तन

♠

*माझ्या मनांतील काळें*

माझ्या मनांतील काळें
आकळलें कळसूत्री
कृष्णालाच. वत्सलता
मत्सरली चंद्रनेत्रीं

अंतर्यामींचीही तशी
निर्मळता हरवलें
सारें अंग रंगरंगीं
कपटाने सारविलें

पुढे ऐकिल्या कागाळ्या
राधेच्याही जवळून
लाटेखालीं बाटलें मीं
कालिंदीला कवळून

नाही कळलीच प्रीति :
फक्त दिसली अनीति

♠

ठकीचसाठी

ठकीचसाठी थकली होती
बाकी माझी लोकांत
ठकीचसाठी जाइन म्हटलें
विलायतेला झोकांत
ठकीचसाठी गुत्त्यावरती
दारू म्हटलें पाण्याला
क्षणांत बनलों जीवनवादी
जुंपुन गेलों घाण्याला
ठकीचसाठी ठिका घडविली
विकून घरकुल चोरांना
उन्मुख होउन नाक जगाचें
कापिन म्हटलें थोरांना

फसल्यावर पाठीत तिचिया
एक घातला मीं गुद्दा
अनंत पोरें चिडून उठलीं
म्हणती हा अगदी बच्चा

♠

## तुझ्याच मागे

दिवस धावले तुझ्याच मागे
हेंहि उमगलें तुवां थबकतां
रात्री झाल्या कभिन्न काळ्या
तेव्हापासून तुला विसरतां

जाणीव ओढी उरलेंसुरलें
मौनाच्या डोहांतील पाणी
कातरलेल्या हुंकाराविण
सुकुन मरावी निश्चल वाणी

पुन्हा उद्या वा परवा येशिल
पुनश्च येईल बहर दिसांना
मोठ्या रात्री येउनि भिडतिल—
भिडतिल माझ्या नसानसांना !

अवशेष

तुझें मन माझें मन
शरीराचें होतें धन
तुझे डोळे माझे डोळे
केसामध्ये होतें जाळें
तुझे केश माझे केश
चंद्रातले दोन देश

ओठांतला थोडा फेस
तुझे-माझे अवशेष

♠

गात वेगळें

गीत वेगळें म्हणेन जर का
तुझी ऐकतां उडेल छाती !
तूपसाखरेच्या ओठांना
पचायची ना अर्धी रोटी

रात्री होत्या वेताळाच्या
परि उशाला स्वप्नें स्वप्नें
म्हणून म्हटलीं वेडी गाणीं
म्हणून आलीं चौदा रत्नें

मला चावले मातीचे कण
मला घेरिलें उग्र दिशांनी
पण गगनाचें कवाड उघड
निळें, तयाची नशा मन्मनीं

व्यवहाराला होतीं भूतें
त्यांच्या सांगिन जर का गोष्टी
(समंध होइन तेव्हां मीही)
हवी ऐकण्या छाती मोठी

♠

### तीं दोघें

ती आहे तो आहेच मुळी
त्यांच्यात फक्त नच भाषा
दोघांचें जमण्याची आहे
इतरांना बळकट आशा

आली भाषा मस्त बिलगली
तनमन दोघें मतवालीं
मेतकूट पाहुन इतरांच्या
गालांवर चढली लाली

पुढे निघाली धूर्त, समंजस
लग्नाविण सुटुनी गेली
पाहुन त्यांना विनापाश मग
इतरांना लाज वाटली....

पाकळ्या
आणि
साखळी

पाकळ्या आणि साखळी
दिसूं लागली तिच्या गळीं
भिजल्यागत उगिचच चाले
ओठही चाखते ओले....

पण करूं लागली यत्न
दिसण्याचा खूप लहान
पाण्याविण कांही पिण्याची
तिज जाळी विकल तहान

गेले ऋतु, दिवसहि उष्ण....
ती तहान शमली आहे
पाकळ्या आणि साखळी
हलवूनच दमली आहे

♠

चावट तें तें

चावट तें तें हटकुन दिसतें। चावट मीही।
जैशी दृष्टी तसाच जो तो। अवश्य पाही॥
सर्व स्त्रिया पण निरिच्छ दिसती। छोट्या-मोठ्या।
आणि वाटती सजीव झाल्या। निर्जिव काठ्या॥
या काठ्यांनी मला मारिलें। मी तडफडलों।
अधिकच झालों चावट पण मी। मुळीं न रडलों॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
22346
दा. क. 
शाखा (स्थळ प्रत)

♠

रातकिडा

रातकिडा पुनवेस जन्मला
रातकिडा किरमिजी किरकिरा....

शराबनयना अशी तयाची
सखी सकाळिंच दवांत होती
मोजित पात्यांवरचीं मोतीं
रातकिड्याच्या सावलीस ती आली तेव्हां
मुक्तीचीही तिला वाटलें कशास सक्ती ?
अन्यांसहि प्रणयांत मिळाले
पुण्यवंत गण रातकिड्यांचे !

रातकिडा पुनवेस जन्मला
उन्मळलेल्या दवांत आहे
अजून त्याचा पुत्र थोरला....

♠

युगंधराचा
संहार हवा !

विश्वच आहे झुलता झोका
त्यावर अपुलें शरीर फेका !

कितीक हलचल
कितीक किलकिल
करणारी ही मदिरा झोका !

स्त्रिया कलंदर
पुरुष बिलंदर
या विश्वाचें विकृती मंदिर

क्षण नियतीचा
प्रखर भीतीचा
होउन बसला तोच अमंगल

आम्ही दुर्बल
तुम्हीहि निर्बल
प्रचंड अपुले संसार शिवा !
युगंधराचा संहार हवा !

*लिंबाखालीं*

लिंबामागे
दडून, रोटी
चन्द्रम खातो
शिळया तुपाशी;

लिंबाखालीं
पाणी सुटतें
मग बाळाच्या
मुखा उपाशी.

♠

मेघच व्हावें आकाशाने

जमदग्नी वैशाख भडकला
आडावर माजला गलबला
हाडें पाण्याचीं वर आलीं
सरड्यानेही रंग बदलला

ओठ मातिचे फुटूं लागले
सावकारांची नीज पळाली
गोणींतिल खंगलें बियाणें
गालफडें श्रमिकांचीं सुकलीं

धैर्यमेरु ताडामाडांचें
जावळ झडलें, उरली शेंडी
झरत्या डोळ्यांना ढोरांच्या
स्वप्नामध्ये दिसली पेंढी

मेघच व्हावें आकाशाने
मातीने कणकण लहरावें....
अखंड भूमी चातक आहे
ऋतुराजा त्वां यावें यावें

♠

*मोजावीं पाउलें*

मोजावीं पाउलें । पुसटाव्या रेषा ।
जाऊं नये देशा । अनोळखी ॥

उन्हामध्ये घ्यावा । चांदण्याचा वास ।
आणि दोन श्वास । वाऱ्यावर ॥

वाटतां उदास । बघावें क्षितिज ।
डोळ्यांवर नीज । पांघरावी ॥

अन्तरांत जाग । आली तरी स्तब्ध ।
काढूं नये शब्द । कधीं ऊष्ण ॥

♠

पावसास
गंध नवा

पावसास गंध नवा;
मातीवर वळ जुनेच.
पळ वरती नभ खुललें;
अळवाचे तळ सुनेच.

मध्यान्ह
झपाटित
आली

मध्यान्ह झपाटित आली
छायांच्या कापित माना
अन् भूत होउनि बसली
झाडांच्या मानगुटींना

प्राशून झळींतील मदिरा
भस्मासुर झाला वारा
या टिचभर राखेसाठी
ढवळितो चराचर सारा

आकाश पेटवुन आता
वैरी हा रवि उन्मत्त
सृष्टिच्या शवा बेवारस
बैसला आग लावीत !

♠

आपुला हा
थोर देश

तुझ्या काना माझ्या काना आल्या कुणाच्याशा ताना
रडत तो होता जसा गोकुळांत कान्हा
पान्हा मला फुटेचना, रडे त्याचें मिटेचना
माझ्या संसाराचा भार, राजा, तुला उचलेना
तुला जावयाचें आहे सकाळींच कामासाठी
मला मरायचें आहे अर्धनग्न पोरांसाठी
तुलामला फक्त नाही चार पोरांचे हे क्लेश
खूप मोठा आपुला हा आहे जुना थोर देश

उजाड देशीं

उजाड देशीं उजेडाविना
वणवण फिरलों भोळा;
घरोघरीं मज लुटिलें, नंतर
कण कण झालों गोळा.

## संध्याकालीन पावसांत

एक विशुद्ध संध्याकाल
परमेश्वराचा अस्त

अंतर्गत अंधार येईल
अर्धे जीवन काळोखेल
अर्धे जीवन उजळेल

नृत्य, सुवासिक नाटक, संगीत,
खून, दरोडे, चोऱ्यामाऱ्या
आणि स्त्रियांशी भंपक चाळे.
निर्विवाद पटलेलें दिवसाचें पावित्र्य.

कांही नरनारी, एक सुकन्या, एक सुपुत्र
आयुष्याच्या संध्याकालीन पावसांत
अंधकारमय प्रदेशांत, अद्यतन वेषांत
शोभतात: त्यांच्या हृद्य मुखावरील
भाव लोपतात

हा एक विशुद्ध, मिश्र संध्याकाल :
एका परमेश्वराचा अस्त
दुसऱ्या परमेश्वराचा उदय